Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-9 | Oct-2014
Available online at www.lbp.world

# नागपूर जिल्हयातील महिला बचत गटांच्या कार्य व नाबार्डच्या विविध योजनांची भूमिकाः एक अध्ययन

डॉ. प्रफल्ल वा. सुदामे
संशोधनकर्ता
सी. पी. ॲन्ड बेरार कॉलेज, नागपुर.

**सारांश**

प्रस्तुत प्रकरणात विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील ३५ बचतगटातील प्रत्येकी ०५ बचत गट सदस्यांकडून म्हणजेच एकूण १७५ बचत गट सदस्यांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता Non-Parametric Chi Square Test (गैर-प्राचल काई वर्ग परिक्षण) या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला.

**प्रस्तावना**

बचत गटांच्या चळवळीचे जनक नोबेल पुरस्कार विजेते डॉ. महमंद युनूस यांनी महिलांमध्ये बचत गटांच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण केला. ग्रामीण बँकेसारखी संकल्पना राबवून गरिबी निर्मुलनाचा जणू त्यांनी वसाच घेतला. आज जगभरात बचत गटांची चळवळ फोफावली आहे. १९८२ पासून बचत गट स्थापना व निर्मितीस मोठ्या प्रमाणावर वेग आला. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) हे गट आणि बँकांकडून होणाऱ्या पतपुरवठ्याची सांगड घातल्यानंतर बचतगट चळवळ व्यापक होत गेली. देशात एकुन ४० लाख बचत गट आहेत. त्यापैकी ३० लाख गटांना कर्ज व अनुदानापोटी आठ हजार कोटीची मदत शासनाने केली आहे. या वर्षी दहा हजार कोटी रूपयापर्यंत मदतीचा आकडा जाईल. विशेष म्हणजे कर्ज परतफेड प्रमाणपत्र ८६ टक्के आहे. हे प्रमाण उद्योग शेती कर्जाच्या

तुलनेत कौतुकास्पद आहे. महिला बचतगट स्थापल्यामुळे ग्रामीण विभागातील महिलांना आत्मसन्मान मिळाला आहे.

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर बहुतेक जिल्ह्यांमध्ये या बचत गटांचे जाळे पसरले आहे. शेतीच्या उत्पन्नातून किंवा कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायातून मिळणारा पैसा घरात खर्च होत असला तरी घरच्या बाईच्या हातात तो नसायचा. तिला तिच्या मर्जीप्रमाणे पैसे खर्च करणे किंवा कुटुंबाच्या कमाईला हातभार लावणे शक्य होत नसे. बचत गटांच्या माध्यमातून पैसा थेट तिच्या हातात गेला. पुरुषांपेक्षा स्त्रिया उत्तम व्यवस्थापक असल्यामुळे त्याचे योग्य नियोजन करुन स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना एक पर्याय खुला झाला त्यातुनच खूप मेहनतीने खाद्र्यपदार्थ, उदबत्या, मेणबत्त्या, फराळ, मसाले असे विविध उद्र्योग महिलांनी उभे करुन स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केला. अत्यंत गरीब परिस्थितीतून येऊन बचत गटांच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभा राहिलेल्या महिलांच्या यशस्वी कहाण्या महाराष्ट्रामध्ये खुप सांगता येतील.

मात्र गेली २० वर्षे ही चळवळ ज्या पद्धतीने पसरायला हवी होती आणि तिचा उद्र्देश सफल व्हायला हवा होता, तसा झालेला नाही. बचत गटामुळे गरिबी निर्मूलनही झालेले नाही. किंबहुना राष्ट्रीय बँकाची आडमुटी धोरणे, बचत गटांना सरकारची मदत नसणे, अल्प कर्जपुरवठा संस्थांचे (मायक्रो फायनान्स इन्सिटट्यूट) कर्जाचे अव्वाच्या सव्वा दर आणि राजकीय पक्षांकडून बचत गटांना होणारा वापर अश विविध कारणांमुळे महिला बचत गटांच्या या चळवळीला घरघर लागल्याचे दिसते. या सर्व पार्श्वभुमीवर सदर अभ्याचे महत्व अनन्य साधारण असे आहे.

नागपूर जिल्ह्याची आर्थिक सामाजिक पार्वभुमी इतर जिल्ह्याच्या तुलनेत वेगळी आहे. त्या मुळे महिला बचत गटांची कार्यप्रणाली व त्यांच्या समोरील अळथळे यांचा नागपूर जिल्ह्याच्या पार्श्वभुमीवर अभ्यास करून त्याचा संशोधात्मक निष्कर्ष समोर मांडने खुप गरजेचे आहे.

महिला बचत गटांची आजची स्थिती व भविष्यातील संभावित धोरणात्मक वाटचाल या सर्वाचे शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून एक दिशादर्शक अभ्यास सर्वांसमोर येणे गरजंचे असल्याने सदर विषयाची निवड महत्वाची ठरते.

**सारणी क्रमांक १: बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| **बचत गटातील सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १६३ | ९३.१ |
| नाही | ०४ | २.३ |
| सांगता येत नाही | ०८ | ४.६ |
| **एकूण** | **१७५** | **१००** |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **563.680** | **2** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९३.१ टक्के बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २.३ टक्के व ४.६ टक्के होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ५६३.६८०; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| **बचत गटातील सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ११९ | ६८.३ |
| नाही | ४१ | २३.१ |
| सांगता येत नाही | १५ | ८.६ |
| **एकूण** | **१७५** | **१००.0** |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **257.688** | **2** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ६८.३ टक्के बचत गट सदस्यांना नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २३.१ टक्के व ८.६ टक्के होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गट सहभागितेमुळे नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – २५७.६८८; P<0.0५) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**निष्कर्ष,**

नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे स्त्रियांच्या शारीरिक आरोग्यात सुधारणा झाली असून बचत गट सहभागितेमुळे त्यांना बचतीची सवय लागली आहे. नागपूर जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली आहे. बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे. सारणी क्रमांक १ मधिल माहितीनूसार बचत गट सदस्यांच्या बचत गट

सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये महत्वपूर्ण (काई वर्ग मूल्य – ५६३.६८०; P<०.०५) प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे प्रचलीत बँक प्रणालीचा व धोरणाचा प्रभाव महिला बचत गटांच्या कार्यावर होत आहे.

**संदर्भ ग्रंथसुची**


१. डॉ. आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन, नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- नागपूर